जनसंपर्क अधिकारी

**पोलीस आयुक्त, मिरा-भाईंदर वसई-विरार यांचे**

कार्यालय

रामनगर, सृष्टी, मिरारोड पुर्व, ता. जि. ठाणे.

**Email ID – pro.cp.mb-vv@mahapolice.gov.in**


**प्रेसनोट क्रं- ७/२०२२** **दिनांक- ०५/०१/२०२२**

---

**वरसावे पुलाजवळील चौकामध्ये व्हेईक्युलर अंडरपास तयार करायचा असल्याने मुंबईकडून वसई अहमदाबादकडे जाणारी वाहतूक दि. ०५/०१/२०२२ रोजी २०.०० वाजले पासून पुढील आदेश होईपर्यत वळविण्यात येत आहे.**

मुंबई- अहमदाबाद हायवे वरील वरसावे जंक्शन येथे नॅशनल हायवे ऑथोरीटी ऑफ इंडीया (एन.एच.ए.आय.) तर्फे नवीन उड्डाणपूलाचे काम चालू आहे. वरसावे चौकामध्ये व्हेईक्युलर अंडरपास (व्हियुपी) चे बांधकाम करण्यासाठी वरसावे चौकामध्ये मुंबईकडून गूजरातकडे जाणारी एक वाहिनी पूर्णपणे बंद करावी लागणार आहे. त्यामुळे मोठया प्रमाणात वाहतूक कोंडी टाळण्यासाठी उपाययोजना करणे आवश्यक आहे. व्हेईक्युलर अंडरपासचे पुढील काम सुरु करायचे असल्याने काम करताना भविष्यात येणाऱ्या अडचणी समजावून घेण्यासाठी व काय काय समस्या उद्‌भऊ शकतात याचा सविस्तर अभ्यास करण्यासाठी एनएचएआयला उपाय करणे आवश्यक झाले होते. त्याकरीता दि. ०३/०१/२०२२ रोजी पासून ते दि. ०५/०१/२०२२ रोजी रात्री २०.०० वाजे पर्यंत तीन दिवस वरसावे नाका येथे मुंबईकडून गुजरातकडे जाणारी मुळ वाहिनी इंडीयन ऑईल पेट्रोल पंपासमोरुन वाहतूकीसाठी बंद करण्यात येऊन वाहने पर्यायी मार्गाने वळविण्यात आली होती.

तरी सदरचे काम पुढे चालू राहणार असल्याने दि. ०५/०१/२०२२ रोजी २०.०० वाजले पासून **पुढील आदेश होईपर्यंत** प्रवाशांना खालीलप्रमाणे पूर्वीचाच पर्यायी मार्ग देण्यात येत आहे.

| अ.क्र. | वाहने | पर्यायी मार्ग |
|---|---|---|
| १. | मुंबई कडून वसई/ पालघर/ गुजरातकडे जाणारी वाहने | • वरसावे नाक्याजवळील इंडीयन ऑईल पेट्रोलपंपाचे अलीकडून महामार्गाला मिळणाया जुन्या घोडबंदर मार्गाने जातील.<br>• सदर मार्गाने वरसावे चौकात मिळून **डावे बाजूस वळून** इच्छित स्थळी जातील. |
| २. | मुंबई कडून ठाणे / नाशीक /पुणे कडे जाणारी वाहने | • वरसावे नाक्याजवळील इंडीयन ऑईल पेट्रोलपंपासमोरील डायव्हर्शन रोडने जातील.<br>• सदर मार्गाने वरसावे चौकात मिळून **ऊजवे बाजूस वळून** इच्छित स्थळी जातील. |

तरी जनतेला व वाहन चालकांना सूचित करण्यात येते की, काशिमीरा बाजूकडून वरसावे नाक्यापर्यंत जाताना त्यांनी पुढील काही दिवस वरील नमुद पर्यायी मार्गाचा वापर करावा. वाहन चालकांनी दिशादर्शक फलकावरील सूचनांचे काटेकोरपणे पालन करावे. सदर कामाचे महत्व ओळखून जनतेने वाहतूक पोलीसांनी दिलेल्या निर्देशाचे पालन करून प्रशासनास आवश्यक सहकार्य करावे याबाबत पोलीसांकडून आवाहन करण्यात येत आहे.